व्यंकटेश महाविद्यालयात नवोदितांचे स्वागत समारंभ संपन्न

श्री वेंकटेश महाविद्यालयातील बी.कॉम. आयटी. विभागाअंतर्गत बी.कॉम. आयटी. प्रथम वर्षामध्ये नवीन प्रवेश घेतलेल्या नवोदितांचे स्वागत समारंभ आयोजित करण्यात आलेला होता. बी.कॉम. आयटी. क्षेत्राचे महत्त्व सातत्याने वाढू लागल्याने बी.कॉम. आयटी. मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे एआयच्या युगामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाला महत्त्व प्राप्त होत असून बी.कॉम. आयटी. प्रथम वर्षातील नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना भविष्यकाळामध्ये अनेक सुवर्णसंधी उपलब्ध होणार असून त्यासाठी बी.कॉम. आयटी. च्या तीन वर्षांमध्ये चांगल्या प्रकारे ज्ञान अर्जित करून चांगल्या ग्रेडने पास होणे आवश्यक आहे असे उपदेशात्मक विधान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये केले. सदर कार्यक्रमाप्रसंगी नोडल ऑफिसर डॉ. एस. एन. जरंडीकर यांनी एनइपी २.० स्ट्रक्चर याबद्दल मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील शिस्त, नियम व अटी यांचे पालन यासंबंधीची माहिती महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक श्री. अमीन बाणदार यांनी केले. ग्रंथालय संदर्भातील माहिती सांगण्यासाठी ग्रंथपाल श्री. एम. पी. केसरकर उपस्थित होते. त्याचबरोबर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी. एन. कांबळे यांनी भाषण त्यांनी दिले. सदर कार्यक्रमाचे आयोजन व नियोजनाची जबाबदारी बी.कॉम. आयटी. विभागाचे विभाग प्रमुख श्री. एम. डी. जाखले यांनी केले त्यासाठी त्यांचे सहकारी प्राध्यापक सौ. के. वी. जगनाडे, सौ. एस. ए. होगाडे आणि सौ. एस. एस. परदेशी यांचे सहकार्य लाभले. प्रमुख पाहुण्यांची ओळख आणि कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. एम. डी. जाखले यांनी केले. सदर कार्यक्रमाप्रसंगी नवीन विद्यार्थ्यांसाठी गेम्स, विविध स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या शेवटच्या प्रसंगी आभार प्रदर्शनाची जबाबदारी सौ. एस. एस. परदेशी यांनी तर सूत्रसंचालनाची जबाबदारी सौ. के. वी. जगनाडे यांनी पार पाडली.


SHRI VENKATESH MAHAVIDYALAYA,
ICHALKARANJI.
INDUCTION PROGRAMME
Shri Venkatesh Mahavidyalaya,
सारंग दास,इचल.